सकाळ
सातारा, गुरुवार, ६ मे २०२१

# साताऱ्यात होणार रयतचे समूह विद्यापीठ

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता

**मुंबई, ता. ५ :** सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने, समूह विद्यापीठ निर्माण करणे शक्य व्हावे, यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्यभरातील उच्च शैक्षणिक संस्था अंतरनिहाय विखुरण्यामधील मोठी तफावत दूर करण्याकरिता समूह विद्यापीठे स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. ज्या महाविद्यालयांकडे पुरेशा शैक्षणिक, भौतिक व तांत्रिक पायाभूत सोयीसुविधा आहेत. अशा ३ ते ५ विद्यमान महाविद्यालयांची संसाधने एकत्रित करून ही विद्यापीठे निर्माण करण्याकरिता, तसेच विद्यापीठाचे विविध दर्जात्मक मापदंड मोठ्या प्रमाणात दर्शवून गुणवत्तेचा दर्जा राखण्यात समर्थ असलेल्या महाविद्यालयांचा समावेश करण्यात येईल.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा (स्वायत्त) हे मुख्य महाविद्यालय व धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा (स्वायत्त) आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा (स्वायत्त) ही दोन सहभागी महाविद्यालये या तीन अनुदानित महाविद्यालयांचा समावेश असलेले कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

> **रयतचे हे विद्यापीठ पूर्ण अनुदानित आणि शासनाच्या मान्यतेचे असणार आहे. ॲकॅडेमिक अधिकार रयत शिक्षण संस्थेकडे असणार असून, विद्यार्थ्यांचे सर्व कौशल्य विकसित करणारा, स्टार्टअपला चालना आणि संशोधनाला प्रोत्साहन देणारा नॅशनल एज्युकेशन पॉलिसीप्रमाणे अभ्यासक्रम असणार आहे. परीक्षा पद्धतीही वेगळी असणार आहे. आगामी काळात संस्थेची सर्व महाविद्यालये या विद्यापीठाच्या कक्षेत येऊ शकतील. कर्मवीरांचे स्वप्न आज पूर्ण होत आहे. याचा खूप आनंद आहे.**
>
> **- डॉ. अनिल पाटील,**
> कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.

... विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात